"ज्ञान, विज्ञान आणि सुसंस्कार यांसाठी शिक्षण प्रसार"

- शिक्षण महर्षी डॉ. बापूजी साळुंखे

**Shri Swami Vivekanand Shikshan Sanstha, Kolhapur**

# Dattajirao Kadam Arts, Science and Commerce College,

# Ichalkaranji

# LIBRARY

## Newspaper Clippings

## 2020-21

सकाळ दि. 10 आक्टो. 2020.

10 आक्टो 2020

**सकाळ**

» दृष्टिक्षेपात



इचलकरंजी : डीकेएएससी महाविद्यालयात माझे कॉलेज, माझी जबाबदारी या उपक्रमांतर्गत स्वच्छता करण्यात आली.

## डीकेएएससी महाविद्यालयात स्वच्छता

**इचलकरंजी :** डीकेएएससी महाविद्यालयात माझे कॉलेज, माझी जबाबदारी या उपक्रमांतर्गत महाविद्यालय परिसराची स्वच्छता केली. महाविद्यालय सुरू होण्याच्या पार्श्वभूमीवर विविध ठिकाणचा कचरा, वर्ग खोलींची स्वच्छता केली. एनसीसी विभागाकडून ही स्वच्छता मोहिम राबवली. प्रा. मेजर मोहन वीरकर, प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम राबवला जात आहे. प्रा. सौ. ढोबळे, प्रा. अरुण कटकोळे आदी सहभागी झाले होते.

LIBRARY

CS Scanned with CamScanner

कोल्हापूर जिल्हा

कोल्हापूर, बुधवार, २१ ऑक्टोबर २०२० II

# ‘थुंकीमुक्त इचलकरंजी’साठी जागर

## ‘डीकेएएससी’, ‘रोटरी’तर्फे रॅली; एनएसएस, एनसीसीचे विद्यार्थी सहभागी

सकाळ वृत्तसेवा

**इचलकरंजी, ता. २० : थुंकीमुक्त इचलकरंजी शहर बनविण्यासाठी डीकेएएससी महाविद्यालय व रोटरी क्लबने पुढाकार घेत शहरातून जनजागृती रॅली काढली. थुंकीमुक्त स्लोगन असलेले बॅनर, पोस्टर हातात धरून घोषणा देत एनएसएस व एनसीसीच्या विद्यार्थ्यांनी शहरात प्रबोधनाचा जागर केला. थुंकीमुक्तीच्या फलकांनी नागरिकांचे लक्ष वेधून घेतले.**

डीकेएएससी महाविद्यालयातून उपप्राचार्य एस. आय. नुराणी यांच्या हस्ते ध्वज दाखवून थुंकीमुक्त रॅलीला प्रारंभ झाला. शहरातील शाहू पुतळा, शिवाजी पुतळा या मुख्य मार्गावरून रॅली काढली. रॅली शहर वाहतूक नियंत्रण शाखेजवळ आल्यानंतर स्वागत केले. रॅलीला संबोधित करत इचलकरंजीत थुंकीमुक्त चळवळ अत्यावश्यक असल्याचे सहायक पोलिस निरीक्षक नंदकुमार मोरे यांनी सांगितले. रोटरी क्लबचे सदस्य, एनसीसी, एनएसएसचे विद्यार्थी, प्राध्यापक रॅलीत सहभागी झाले. प्रबोधनात्मक पोस्टर, घोषणा व ध्वनिक्षेपकाद्वारे थुंकीमुक्तीची जागृती केली.

थुंकीमुक्त रॅलीचा समारोप गांधी पुतळा चौकात झाला. रस्त्यावर थुंकणार नाही, कोणाला थुंकूही देणार नाही, या संकल्पनेने नागरिकांनी वावरले पाहिजे. सुदृढ निरोगी आरोग्यासाठी थुंकीमुक्त प्रबोधन महत्त्वाचे ठरणार आहे, असे मार्गदर्शन रोटरीचे सहायक प्रांतपाल मनीष मुनोत यांनी केले. अभय यळरुटे, दीपक निगुंडगेकर, प्रकाश गौड, दिनेश कवडे, प्रकाश रावळ, डॉ. अभिजित कलावडे, सौ. मेघा यळरुटे, सौ. वैभवी निगुंडगेकर, प्रा. मेजर मोहन वीरकर, प्रा. डॉ. वैशाली ढोबळे, प्रा. अरुण कटकोळे, प्रा. विशाल कांबळे, प्रा. टी. ए. हराळे आदी उपस्थित होते.



इचलकरंजी : डीकेएएससी महाविद्यालय व रोटरी क्लबने काढलेल्या थुंकीमुक्त जनजागृती रॅलीचे शिवाजी पुतळा चौकात स्वागत करताना शहर वाहतूक शाखेचे अधिकारी.

### अनोख्या संदेशाने वेधले लक्ष

थुंकीमुक्त जनजागृती रॅलीत सहभागी प्रत्येक विद्यार्थ्यांच्या हातात प्रबोधनात्मक फलक होते. ‘माझी इचलकरंजी, माझी जबाबदारी’, ‘नाही म्हणा थुंकण्याला, सुंदर बनवू शहराला’, ‘नका खाऊ गुटखा, लागेल जीवाला झटका’, ‘नको मारू पिचकारी, घाणेरडे म्हणेल दुनिया सारी’ असे अनोखे फलक जनजागृती रॅली मार्गावर नागरिकांचे लक्ष वेधून घेत होते.

Scanned with CamScanner

महासत्ता दि. २२-१०-२०२०.

महासत्ता - २२ ऑक्टो २०२०.

# थुंकीमुक्त शहरासाठी जनजागृती रॅली



इचलकरंजी, ता.२१

कोरोनाचा प्रसार रोखण्यासाठी थुंकीमुक्त इचलकरंजी शहर करण्यासाठी नागरिकांमध्ये जागृती निर्माण व्हावी यासाठी रोटरी क्लब ऑफ इचलकरंजी व डिकेएएससी कॉलेजने पुढाकार घेतला आहे. त्या अनुषंगाने शहरातून जनजागृती रॅली काढण्यात आली.

डीकेएएससी महाविद्यालयातून उपप्राचार्य एस. आय. नुराणी, रोटरी क्लबचे अध्यक्ष अभय यळरूटे यांच्या हस्ते ध्वज दाखवून रॅलीचा प्रारंभ झाला. शहरातील प्रमुख मार्गावरून ही रॅली काढण्यात आली. शहर वाहतूक नियंत्रण शाखेजवळ रॅलीचे स्वागत करण्यात आले. यावेळी इचलकरंजी शहरात थुंकीमुक्त चळवळ अत्यावश्यक असल्याचे शहर वाहतूक नियंत्रण शाखेचे सहाय्यक पोलिस निरिक्षक नंदकुमार मोरे यांनी सांगीतले. या रॅलीत रोटरी क्लबचे सदस्य, रोटरी अॅनस, अॅनेटस्, एनसीसी, एनएसएस चे विद्यार्थी, प्राध्यापक सहभागी झाले.

रॅलीचा समारोप गांधी पुतळा चौक येथे झाला. मी रस्त्यावर थुंकणार नाही, कोणाला थुंकूही देणार नाही या संकल्पनेने नागरिकांनी वावरले पाहीजे. सदृढ निरोगी आरोग्यासाठी थुंकीमुक्त प्रबोधन महत्वाचे ठरणार आहे, असे मार्गदर्शन रोटरीचे सहाय्यक प्रांतपाल मनिष मुनोत यांनी केले.

यावेळी सेक्रेटरी दीपक निगुडगेकर, प्रकाश गौड, दिनेश कवडे, प्रकाश रावळ, डॉ. अभिजीत कलावडे, सौ. मेघा यळरूटे, सौ. वैभवी निंगुडगेकर, रोटरी अॅनिटस्चे अध्यक्ष सत्यम निगुडगेकर, सेक्रेटरी शंतनु यळरूटे, प्रा. मेजर मोहन वीरकर, प्रा. डॉ. वैशाली ढोबळे, प्रा. अरूण कटकोळे, प्रा. विशाल कांबळे, प्रा. टी. ए. हराळे यांच्यासह विद्यार्थी-विद्यार्थीनी उपस्थित होत्या.

LIBRARY

Scanned with CamScanner

पुढारी दि. २२ आक्टो. २०२०.

पुढारी - 22 आक्टो 2020



इचलकरंजी : येथे थुंकीमुक्त अभियान अंतर्गत शहरातून जनजागृती रॅली काढण्यात आली.

# थुंकीमुक्तीसाठी इचलकरंजीत रॅली

इचलकरंजी : पुढारी वृत्तसेवा

रोटरी क्लब आणि डीकेएएससी महाविद्यालयाच्या संयुक्त विद्यमाने इचलकरंजी शहर थुंकीमुक्त करण्यासाठी जागर करण्यात आला. या अनुषंगाने थुंकीमुक्तीचा संदेश देणारे बॅनर घेऊन एनएसएस व एनसीसीच्या विद्यार्थ्यांनी शहरातून जनजागृती रॅली काढली.

उपप्राचार्य एस. आय. नुराणी, रोटरीचे अध्यक्ष अभय यळरुटे यांनी ध्वज दाखवून रॅलीस प्रारंभ केला. शहरात थुंकीमुक्त चळवळ अत्यावश्यक असल्याचे वाहतूक विभागाचे सपोनि नंदकुमार मोरे यांनी नमूद केले. थुंकणार नाही आणि कोणालाही थुंकू देणार नाही, या भूमिकेतून नागरिकांनी वावरले पाहिजे, अशी अपेक्षा यावेळी व्यक्त करण्यात आली.

LIBRARY

LIBRARY

Scanned with CamScanner

दै. लोकमत दि. २३-१०-२०२०.

LIBRARY



इचलकरंजीतील रोटरी क्लब व डीकेएएससी कॉलेजने काढलेल्या थुंकीमुक्त जनजागृतीची रॅली शिवाजी पुतळा चौकात आल्यानंतर स्वागत करण्यात आले.

# थुंकीमुक्त इचलकरंजीसाठी प्रबोधन

## रोटरी क्लब, 'डीकेएएससी'कॉलेजचा संयुक्त उपक्रम

लोकमत न्यूज नेटवर्क

**इचलकरंजी :** कोरोनाचा प्रसार रोखण्यासाठी व थुंकीमुक्त इचलकरंजी शहर करण्यासाठी रोटरी क्लब व डीकेएएससी कॉलेजने शहरातून जनजागृती रॅली काढली.

थुंकीमुक्तीच्या घोषणा असलेले बॅनर, पोस्टर हातात धरून घोषणा देत नागरिकांनी प्रबोधनाचा जागर केला. थुंकीमुक्तीच्या फलकांनी नागरिकांचे लक्ष वेधून घेतले. उपप्राचार्य एस. आय. नुराणी व 'रोटरी'चे अध्यक्ष अभय यळरुटे यांच्या हस्ते ध्वज दाखवून रॅलीस प्रारंभ झाला. शाहू पुतळा व शिवाजी पुतळा या मुख्य मार्गांवरून रॅली काढली. ही रॅली शहर वाहतूक नियंत्रण शाखेजवळ आल्यानंतर स्वागत केले. सहायक पोलीस निरीक्षक नंदकुमार मोरे यांनी शहरात थुंकीमुक्त चळवळ अत्यावश्यक असल्याचे सांगितले. या रॅलीचा समारोप गांधी पुतळा चौकात झाला. रस्त्यावर थुंकणार नाही, कोणाला थुंकूही देणार नाही, या संकल्पनेने नागरिकांनी वावरले पाहिजे.

सुदृढ, निरोगी आरोग्यासाठी थुंकीमुक्त प्रबोधन महत्त्वाचे ठरणार आहे, असे मत मनीष मुनोत यांनी व्यक्त केले. यावेळी दीपक निंगुडगेकर, प्रकाश गौड, दिनेश कवडे, प्रकाश रावळ, मेघा यळरुटे, वैभवी निंगुडगेकर उपस्थित होते.

LIBRARY

CS Scanned with CamScanner

दै. सकाळ दि. २९ आक्टो २०२०



इचलकरंजी : रोटरी क्लबतर्फे आयोजित पोलिओ जनजागृती अभियानातील सहभागी विद्यार्थ्यांना प्रमाणपत्रांचे वाटप करताना जयश्री गायकवाड, हेमेंद्र पोरवाल आदी.

## पोलिओ जनजागृती अभियान

**इचलकरंजी :** रोटरी क्लबतर्फे विविध ठिकाणी मोठ्या प्रमाणात पोलिओ जनजागृती अभियान राबविण्यात आले. मोटार रॅली, सायकल रॅलीसह पोलिओ संदेश देत जनजागृती रॅली काढण्यात आली. अतिग्रे, हातकणंगले, हुपरी, कुरुंदवाड, शिरोळ, जयसिंगपूर, इचलकरंजी आदी ठिकाणी रोटरी क्लबतर्फे पोलिओ जनजागृती अभियानाचे आयोजन केले. रॅलीच्या समारोपप्रसंगी अप्पर पोलिस अधीक्षक जयश्री गायकवाड, हेमेंद्र पोरवाल यांच्या हस्ते जनजागृती अभियानात सहभागी विद्यार्थ्यांना प्रमाणपत्रांचे वाटप केले. एनसीसी व एनएसएसच्या विद्यार्थ्यांचा सहभाग अग्रणी होता. यावेळी अभय यळरूटे, मीनाक्षी तगंडी, रवींद्र नाकील, मनीष मुनोत, भाऊ नाईक, नितीन शेट्टी, प्रा. मेजर मोहन वीरकर, प्रा. अरुण कटकोळे आदी उपस्थित होते.

LIBRARY

Scanned with CamScanner

महासत्ता दि. २9-आक्टो 2020.

DATTAJIRAO KADAM A.S.C.COLLEGE,ICHALKARANJI LIBRARY



पोलिओ अभियान रॅलीचे प्रमाणपत्र वितरण करताना अप्पर पोलीस अधिक्षक जयश्री गायकवाड, रोटरीचे अध्यक्ष अभय यळरुटे, मनिष मुनोत व इतर मान्यवर.

# रोटरी क्लबतर्फे पोलिओ जनजागृती अभियान

KADAM A.S.C. COLLEGE ICHALKARANJI LIBRARY

**इचलकरंजी,ता.२८–**

येथील रोटरी क्लबतर्फे पोलिओ जनजागृती अभियान, मोटरसायकल रॅली राबविण्यात आली. इचलकरंजी, हुपरी, कुरुंदवाड, शिरोळ, जयसिंगपूर, हातकणंगले, अतिग्रे येथील १३ क्लब मिळून ही मोटरसायकल रॅली घेण्यात आली. या रॅलीची सुरुवात अतिग्रे येथे रोटरीचे गव्हर्नर संग्राम पाटील, पोलिस उपअधिक्षक प्रविण गिल्डा, हातकणंगले डिस्ट्रिक्ट सेक्रेटरी नासिर बोरसादवाला यांच्या हस्ते ध्वज दाखवून करण्यात आली. या रॅलीमध्ये डिकेएससी महाविद्यालयातील प्रा. मोहन विरकर, प्रा.कटकोळे यांच्या मार्गदर्शनाखाली एनसीसी, एनएसएसचे विद्यार्थ्यांनी पोलिओचे संदेश देत जनजागृती अभियान राबविले. ही रॅली इचलकरंजी येथे रोटरी क्लबच्या प्रांगणात समर्पित झाली. यावेळी प्रमाणपत्र वितरण करण्यात आले. या कार्यक्रमास अप्पर पोलिस अधिक्षक जयश्री गायकवाड व रोटरी डिस्टिट पोलिओ कमिटी चेअरमन हेमेंद्र पोरवाल उपस्थित होते. रोटरीचे अध्यक्ष अभय यळरुटे यांनी स्वागत केले. प्रमुख पाहुण्यांची ओळख सौ.मिनाक्षी तंगडी,रविंद्र नाकील यांनी करुन दिली. सूत्रसंचालन व आभार क्लबचे सेक्रेटरी दीपक निंगुडगेकर यांनी केले.

या जनजागृती रॅलीचे संयोजन उपप्रांतपाल मनिष मुनोत, भाऊ नाईक, नितीन शेट्टी यांनी केले. या रॅलीच्या वेळी क्लबचे प्रेसिडेंट, सेक्रेटरी, सदस्य उपस्थित होते. —महासत्ता 29/10/2020

Scanned with CamScanner

सकाळ
शनिवार,
५ डिसेंबर २०२०

DATTAJIRAO KADAM ... COLLEGE, ICHALKARANJI
LIBRARY



इचलकरंजी : दत्ताजीराव कदम एएससी महाविद्यालयात झालेल्या स्नेहमेळाव्यात सहभागी माजी विद्यार्थी.

# कदम महाविद्यालयात स्नेहमेळावा

इचलकरंजी, ता. ४ : महाविद्यालयीन काळ हा अविस्मरणीय असतो, आपले करिअर घडविण्याचे स्वप्न उराशी बाळगून जीवनात यशस्वी ठरलेल्या सर्व माजी विद्यार्थी-विद्यार्थिनींचा आम्हा गुरुजनांना अभिमान वाटतो, असे गौरवोद्गार दत्ताजीराव कदम एएससी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार यांनी काढले. १९९४ ते १९९८ सालातील माजी विद्यार्थी स्नेहमेळाव्यात ते बोलत होते.

कॉलेजमध्ये एमएसस्सी विभाग सुरू करायचे असून त्यास माजी विद्यार्थ्यांनी सहकार्य करावे, असे आवाहन प्राचार्य कुंभार यांनी केले. प्राचार्य कुंभार व सर्व माजी प्राध्यापक व प्राध्यापिकांचा सत्कार माजी विद्यार्थ्यांच्या हस्ते झाला. यामध्ये मल्लाप्पा सुरपुसे, कोतवाल, प्रा, डॉ. शैलजा चनगुंडी, कोरे, मोरे, एम. एम. कांबळे, मेजर मोहन वीरकर यांचा सत्कार केला. या वेळी पुरुषोत्तम परीट, रवींद्र माने, संजय केंगार, नंदकुमार गाडेकर, अमर पाटील, सुरेश भोंगाळे, शुभांगी कोकाटे, अपर्णा कुलकर्णी, राजश्री भागवत, प्रमोद परीट, माधवी लोहार, स्वाती पाटील, जयश्री कुलकर्णी यांनी मनोगत व्यक्त केले. यासीन चौगुले यांनी सूत्रसंचालन केले. बसवराज कोटगी यांनी प्रास्ताविक केले. अमर नवाळे यांनी स्वागत केले. अजय व्हनुगरे यांनी आभार मानले. कार्यक्रमास पराग सुर्वे, महावीर टारे, असिफ कोतवाल, सर्जेराव पडियार, प्रदीप दरिबे, गीता पुजारी, मानिक हुल्ले, सुनीता भगाचे, मनीषा पाटील यांच्यासह माजी विद्यार्थी उपस्थित होते.

Scanned with CamScanner

सकाळ
सोमवार,
१४ डिसेंबर २०२०

LIBRA
DATTAJIRAO

» अवतीभवती



इचलकरंजी : भूतान येथील धावण्याच्या स्पर्धेत सुवर्णपदक प्राप्त केलेल्या कुलदीप याचा सत्कार करताना प्राचार्य डॉ. व्ही. एस. ढेकळे, मेजर मोहन वीरकर.

## कुलदीप पाटीलला सुवर्णपदक

**इचलकरंजी :** भूतान येथे झालेल्या साऊथ एशियन फेडरेशनच्या ३ किलोमीटर धावणे मैदानी स्पर्धेत डीकेएएससी महाविद्यालयाचा विद्यार्थी कुलदीप पाटील याने सुवर्णपदक प्राप्त केले. भूतान येथे २५ ते २७ नोव्हेंबरदरम्यान स्पर्धा झाल्या. तीन किमी अंतर १० मिनिटे २५ सेकंदात पूर्ण करत कुलदीपने सुवर्णपदक प्राप्त केले. हरियाणा येथे झालेल्या राष्ट्रीय स्पर्धेतून त्याची भुतान येथे निवड झाली होती. त्याच्या या यशाबद्दल महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. व्ही. एस. ढेकळे यांच्या हस्ते सत्कार केला. जिमखाना विभागप्रमुख प्रा. मेजर मोहन वीरकर, प्रा. आकाश बनसोडे, सायन्स विभागप्रमुख प्रा. डी. बी. जाधव यांचे मार्गदर्शन लाभले.

CS Scanned with CamScanner

सकाळ
मंगळवार,
१५ डिसेंबर २०२०

LIB

गडहिंग्लज, ता. १४ : क्रीडा प्रेमींनी शहरात क्रीडा संकुलासाठी पाठपुरावा सुरू केला आहे. त्यासाठी जागाही सुचविली आहे. त्यासाठीचे शासकीय सोपस्कार पूर्ण करण्यासाठी ग्रामविकासमंत्री हसन मुश्रीफ यांना साकडे घातले. गडहिंग्लज दौऱ्यावर आलेल्या मुश्रीफ यांना त्याबाबतचे निवेदन देण्यात आले.

शहरातील क्रीडापटुंना क्रीडांगणाचा प्रश्न आहे. त्यासाठी छत्रपती शाहू महाराजांनी शेतीशाळेसाठी दिलेली व सध्या वापराविना असलेली वडरगे मार्गावरील जागा सुचविण्यात आली आहे. या जागेसाठी जिल्हा परिषदेकडे पाठपुरावा सुरू आहे. दरम्यान, क्रीडा

## अवतीभवती



इचलकरंजी : एनसीसी विभागातर्फे आयोजित स्वच्छता पंधरवडा उपक्रमात मार्गदर्शन करताना प्राचार्य डॉ. व्ही. एस. ढोकळे.

## 'डीकेएएससी'त स्वच्छता पंधरवडा

इचलकरंजी : डीकेएएससी महाविद्यालयाच्या एनसीसी विभागातर्फे स्वच्छता पंधरवड्यास प्रारंभ झाला. १ डिसेंबर ते १५ डिसेंबर या कालावधीत स्वच्छता अभियान, हॅण्डवॉश जनजागृती, ऐतिहासिक ठिकाणांची स्वच्छता, स्वतःची स्वच्छता, स्वच्छ भारत अभियान अंतर्गत निबंध स्पर्धा, पोस्टर प्रदर्शन आदी उपक्रम राबविले जाणार आहेत. या पंधरवड्याच्या निमित्ताने महाविद्यालयात हॅण्डवॉशबद्दलची जनजागृती करण्यात आली. एनसीसी कॅडेटांच्यासाठी निबंध स्पर्धेचे आयोजन केले होते. महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा. व्ही. एस. ढोकळे यांच्या हस्ते स्वच्छता पंधरवड्याचे उद्घाटन झाले. ५६ महाराष्ट्र बटालियन एनसीसीचे कर्नल उदय बारावरकर, कर्नल विजयवंत थोरात यांच्या मार्गदर्शनाखाली हा पंधरवडा राबविला जात आहे. प्रा. मेजर मोहन वीरकर यांनी स्वागत व [illegible]ताविक केले. प्रा. डॉ. वै[illegible]गेबळे यांनी आभार मानले.

Scanned with CamScanner

सकाळ
शुक्रवार,
१८ डिसेंबर २०२०

धर्माधिकारी आदी उपस्थित होते.

## डॉ. आळवेकर यांची निवड



डॉ. आळवेकर

**इचलकरंजी :** डीकेएएससी महाविद्यालयातील मराठी विभाग प्रमुख डॉ. एकनाथ आळवेकर यांची प्रोफेसरपदी निवड झाली आहे. श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेत २९ वर्षे ते मराठी विषयाचे अध्यापन करत आहेत. आजपर्यंत त्यांनी समीक्षा ग्रंथाचे लेखन केले आहे. यातील ग्रंथांना पुरस्कारही प्राप्त झाला आहे. त्यांनी विविध नियतकालिकेत ३२ संशोधन लेख लिहिले आहेत.

Scanned with CamScanner

दै. सकाळ दि. २५/१२/२०२०

# डीकेएएससी महाविद्यालयात गणित दिन

**इचलकरंजी :** डीकेएएससी महाविद्यालयात राष्ट्रीय गणित दिनानिमित्त ऑनलाईन कार्यक्रम झाला. प्राचार्य डॉ. व्ही. एस. ढोकळे यांच्या हस्ते श्रीनिवास रामानुजन यांच्या प्रतिमेचे पूजन केले. रामानुजन यांच्या कार्याचा परिचय प्राचार्य डॉ. ढोकळे यांनी करून दिला. ऑनलाईन पद्धतीने झालेल्या कार्यक्रमात गणित विषयाच्या विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. डी. जे. मुंगारे यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. यावेळी प्रा. एस. पी. थोरात, प्रा. डॉ. पी. पी. पुजारी, प्रा. सुप्रिया पाटील, प्रा. वृषाली हत्तरगी उपस्थित होते.

Scanned with CamScanner

सकाळ

शुक्रवार,
१ जानेवारी २०२१

# डीकेएएसी महाविद्यालयात वेबिनार

**इचलकरंजी :** डीकेएएसी महाविद्यालयात बॉम्बे स्टॉक एक्स्सेंज मुंबई संस्थेच्या सहकार्याने भांडवल बाजार जागृकता, कोविड १९ पूर्व आणि नंतर या विषयावर ऑनलाईन वेबिनार झाले. आयक्यूएसी व वाणिज्य विभागाच्या वतीने आयोजित वेबिनारमध्ये महाविद्यालयातील प्राध्यापक व अंतिम वर्षाचे विद्यार्थी सहभागी झाले. भांडवल बाजाराची सद्यस्थिती सांगत बाजारात आर्थिक गुंतवणूक करताना घ्यावयाची दक्षता याबाबत डॉ. शरदकुमार शेट्टी यांनी मार्गदर्शन केले. अध्यक्षीय मनोगत प्राचार्य डॉ. व्ही. एस. ढेकळे यांनी केले. आभार डॉ. व्ही. व्ही. गणबावले यांनी मानले. अक्षय स्वामी, डॉ. ए. एन. पाटील, अझहर दाढीवाले उपस्थित होते.

Scanned with CamScanner

सकाळ

शुक्रवार,
१ जानेवारी २०२१

# एनसीसी भरती आज

दत्ताजीराव कदम एएससी महाविद्यालयामध्ये नव्या शैक्षणिक वर्षातील ५६ महाराष्ट्र बटालियन एनसीसी भरती शुक्रवारी (ता. १) होणार आहे. भरतीसाठी २३० मुले व ७० मुलींनी अर्ज केला आहे. यामधून केवळ १७ मुले व ९ मुलींची भरती होणार आहे. भरती शारीरिक चाचणी, वैद्यकीय चाचणी व मुलाखतीद्वारे होणार आहे. बटालियनचे सुभेदार सुधाकर नवगिरे, सी. व्ही. ठाकूर, परमजितसिंग, हवालदार एस. के. नाईक, दीपक मलिक, विक्रम सिंग भरती उपस्थित राहणार आहेत. भरतीसाठी अर्ज केलेल्या विद्यार्थ्यांनी उपस्थित रहावे असे आवाहन केले आहे.

Scanned with CamScanner

सकाळ

शनिवार,
२ जानेवारी २०२१

DATTAJIRAO KA... C. COLLEGE, ICHALKARANJI
LIBRARY



इचलकरंजी : दत्ताजीराव कदम एएससी महाविद्यालयातील एनसीसी कॅडेटची भरती प्रक्रिया झाली. त्यात १६ एनीसीसी कॅडेट मुले व सात एनसीसी कॅडेट मुलींची निवड करण्यात आली.

# एएससी महाविद्यालयात एनसीसी कॅडेट भरती

सकाळ वृत्तसेवा

इचलकरंजी, ता. १ : दत्ताजीराव कदम एएससी महाविद्यालयातील एनसीसी कॅडेटची भरती प्रक्रिया झाली. शारीरिक चाचणी व लेखी परीक्षेद्वारे एनसीसीसाठी विद्यार्थ्यांची निवड केली. ५६ महाराष्ट्र बटालियनचे एनसीसी कमांडिग ऑफिसर उदय बारावरकर व प्रशासकीय अधिकारी कर्नल थोरात यांच्या उपस्थितीत ही भरती प्रक्रिया झाली. सुभेदार मेजर विलास रामगुडे, मेजर सुधाकर नवगिरे, परमजितसिंह, सीएचएम विक्रमसिंग, हवालदार एस. के. नायक, दिपककुमार मलिक यांच्या नियंत्रणाखाली विद्यार्थी, विद्यार्थीनींनी भरती दिली. सर्व प्रक्रियेद्वारे १६ एनीसीसी कॅडेट मुले व सात एनसीसी कॅडेट मुलींची निवड केली. भरतीसाठी २०० मुले व ५० मुली उपस्थित होत्या. भरती झालेल्या विद्यार्थ्यांना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. व्ही. एस. ढेकळे यांनी शुभेच्छा दिल्या. भरती प्रक्रियेचे नियोजन मेजर मोहन वीरकर, प्रा. वैशाली ढोबळे यांनी केले. जयकुमार करके आदी उपस्थित होते.

Scanned with CamScanner

सकाळ

कोल्हापूर, शुक्रवार,
१५ जानेवारी २०२१

## मेजर वीरकर यांना पुरस्कार जाहीर

**इचलकरंजी :** डीकेएएससी महाविद्यालयातील एनसीसी विभागप्रमुख मेजर मोहन वीरकर यांना रोटरी क्लबतर्फे देण्यात येणारा नेशन बिल्डर अॅवॉर्ड हा पुरस्कार जाहीर झाला आहे. शनिवारी (ता. १६) शहरातील रोटरी क्लबमध्ये भारती विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. माणिकराव साळुंखे यांच्या हस्ते हा पुरस्कार देण्यात येणार आहे. विविध शैक्षणिक कार्यपद्धतीतील समाजोपयोगी उपक्रमाची दखल घेऊन हा पुरस्कार मोहन वीरकर यांना जाहीर झाला आहे. त्यांच्या या निवडीबद्दल महाविद्यालयातर्फे प्राचार्य डॉ. व्ही. एस. ढेकळे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.



मोहन वीरकर

Scanned with CamScanner

सकाळ

कोल्हापूर, शुक्रवार, १५ जानेवारी २०२१

# डीकेएएससी महाविद्यालयात भूगोल दिन

सकाळ वृत्तसेवा

इचलकरंजी, ता. १४ : डीकेएएससी महाविद्यालयात भूगोल विभागाच्या वतीने भूगोल दिन साजरा करण्यात आला.

सामान्य भूगोलशास्त्र आणि आधुनिक भूगोल यामधील तंत्रज्ञान आणि त्याचा वापरा निसर्गाशी मिळते जुळते घेऊन मानवाने पर्यावरण वाचविले पाहिजे. नैसर्गिक साधनसंपत्तीचे संवर्धन केले पाहिजे, असे मत प्रमुख पाहुणे प्रा. डॉ. एस. के. पवार यांनी व्यक्त केले. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. व्ही. एस. ढेकळे होते. प्रास्ताविक डॉ. डी. सी. कांबळे यांनी केले. यावेळी डॉ. आतीष पाटील, प्रा. सचिन जाधव, डॉ. नवनाथ नाईकनवरे, प्रा. सुनील भोसले आदी उपस्थित होते.

CS Scanned with CamScanner

दै. पुढारी दि. 18/1/2021

कोल्हापूर, सोमवार, १८ जानेवारी

# शिक्षण मानवकेंद्रित व्हायला हवे

## डॉ. रघुनाथ माशेलकर; ग्लोबल टीचर रणजितसिंह डिसले यांना पुरस्कार प्रदान

कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा

समाजाचे भविष्य घडविण्याचे सामर्थ्य शिक्षणात आहे. कोरोनाच्या संकटामुळे डिजिटल शिक्षण पद्धती आली आहे. आजचे युग माहिती तंत्रज्ञानाचे असले तरी शिक्षण मानवकेंद्रित व्हायला हवे, असे प्रतिपादन ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ. रघुनाथ माशेलकर यांनी केले.

श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था आयोजित शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे आदर्श शिक्षक पुरस्कार वितरण समारंभात ऑनलाईन संवाद साधताना ते बोलत होते. याप्रसंगी शाहू महाराज यांच्या हस्ते रणजितसिंह डिसले यांना शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे आदर्श शिक्षक पुरस्काराने गौरविण्यात आले.

डॉ. माशेलकर म्हणाले, नवीन बदलांना अनुरूप शिक्षणपद्धती अंमलात आणली पाहिजे. विद्यार्थ्यांनी महत्त्वाकांक्षा, ध्येयनिश्चिती, धैर्य, चिकाटी, संशोधक वृत्ती हे गुण विकसित करून स्वत:ची कार्यशैली निर्माण करण्याची क्षमता वाढविणारे शिक्षण घेतले पाहिजे.

डिसले म्हणाले, शिक्षकांनी एका वर्गापुरते मर्यादित न राहता जग हीच शिक्षणाची कार्यशाळा आहे, असे मानून ग्लोबल टीचर व्हायला पाहिजे. जगभरातील शिक्षणाची पद्धती जाणून व समजून घेऊन नावीन्यपूर्ण विचार करायला लावणारी पिढी शिक्षकांनी घडविली पाहिजे.

शाहू महाराज म्हणाले, जगात विज्ञान व तंत्रज्ञानाचा वापर वाढत आहे. पारंपरिक शिक्षणाच्या चौकटीतून बाहेर पडून आधुनिक शिक्षणपद्धती स्वीकारली पाहिजे.

प्राचार्य अभयकुमार साळुंखे यांचा ७६ व्या वाढदिवसानिमित्त सत्कार करण्यात आला. संस्था सचिव प्राचार्या शुभांगी गावडे यांनी आदर्श शिक्षक पुरस्काराची भूमिका मांडली. आपत्कालीन निधीतून गरीब हुशार विद्यार्थ्यांना आर्थिक मदत दिली जाईल. अभय रिसर्च अँड डेव्हलपमेंट सेंटर सुरू करण्याची घोषणा त्यांनी केली. प्रास्ताविक संस्थेचे सहसचिव (अर्थ) प्राचार्य डॉ. राजेंद्र शेजवळ यांनी केले. सूत्रसंचालन डॉ. कविता तिवडे, प्रा. संजय सुतार यांनी केले. संस्था सहसचिव डॉ. युवराज भोसले यांनी आभार मानले. संस्थेचे उपाध्यक्ष नामदेवराव कांबळे, प्राचार्य डॉ. आर. आर.कुंभार, प्राचार्य डॉ अशोकराव जगताप, प्राचार्य डॉ. अशोक करांडे, प्राचार्य एस. के. कुंभार, प्रा. आर. आर. पाटील, प्रा. एन. जी. गायकवाड, प्राचार्य टी. ए. गवळी उपस्थित होते.



कोल्हापूर : शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे आदर्श शिक्षक पुरस्काराने ग्लोबल टीचर रणजितसिंह डिसले यांना गौरविताना शाहू महाराज. शेजारी प्राचार्य अभयकुमार साळुंखे, नामदेवराव कांबळे, डॉ. राजेंद्र शेजवळ आदी.

Scanned with CamScanner

दै. सकाळ - दि. २०/१/२०२१



इचलकरंजी : डीकेएएससी महाविद्यालयात मुलींसाठी कराटे प्रशिक्षण शिबिरास प्रारंभ झाला.

## 'डीकेएएससी'त कराटे प्रशिक्षण

**इचलकरंजी :** डीकेएएससी महाविद्यालयात शहर व परिसरातील मुलींसाठी कराटे प्रशिक्षण शिबिरास प्रारंभ झाला. रोटरी क्लब, एएससी महाविद्यालय व कन्या महाविद्यालय यांच्यातर्फे हे प्रशिक्षण शिबिर २३ जानेवारीपर्यंत सुरू राहणार आहे. रोटरी क्लबचे अध्यक्ष अभय यळरूटे यांच्या हस्ते शिबिराचे उद्घाटन झाले. मुलींच्या धाडसी स्वभावाला अधिक धाडसी बनविण्यासाठी प्रशिक्षण शिबीर महत्वाची ठरतात, असे मत प्राचार्य डॉ. व्ही. एस. ढेकळे यांनी व्यक्त केले. शहरातील सर्व शाळा महाविद्यालयात येत्या काळात मुलींसाठी कराटे प्रशिक्षण व मुलींना स्वसंरक्षण व आत्मनिर्भर बनवण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे श्री. यळरूटे यांनी सांगितले. प्रशिक्षणात रवीकिरण चौगुले प्रात्यक्षिकांसह मार्गदर्शन करणार आहेत. शिबीराचे नियोजन मेजर मोहन वीरकर व प्रा. वैशाली ढोबळे यांनी केले. सौ. मेघा यळरूटे, दिपक निगुंडगेकर, वैभवी निगुंडगेकर, प्रा. प्रमिला सुर्वे, प्रा. सौ. ए. ए. घारे, प्रा. सौ. पी. पी. पुजारी, प्रा. सौ. ए. एस. तपासे, प्रा. डॉ. आतीष पाटील आदी उपस्थित होते.



इचलकरंजी : डीकेएएससी महाविद्यालयात ग्रंथप्रदर्शन भरविण्यात आले.

## 'डीकेएएससी'मध्ये ग्रंथप्रदर्शन

**इचलकरंजी :** डीकेएएससी महाविद्यालयात विवेकानंद जयंती सप्ताह, मराठी भाषा पंधरवडा व स्वामी विवेकानंद संस्थेचे कार्याध्यक्ष अभयकुमार साळुंखे यांच्या वाढदिनी ज्ञानशिदोरी दिनानिमित्त ग्रंथप्रदर्शन भरविण्यात आले. प्राचार्य डॉ. व्ही. एस. ढेकळे यांच्या हस्ते ग्रंथप्रदर्शनाचे उद्घाटन झाले. प्राचार्य डॉ. ढेकळे यांनी बापूंजीच्या शैक्षणिक कार्याचा आढावा घेतला. प्रास्ताविक डॉ. डी. सी. कांबळे यांनी केले. यावेळी प्रा. साठे, प्रा. आवटी, मेजर मोहन वीरकर, ग्रंथपाल विजय यादव उपस्थित होते.

CS Scanned with CamScanner

सकाळ

कोल्हापूर, गुरुवार,
२१ जानेवारी २०२१

# डीकेएएससी महाविद्यालयात रक्तदान शिबिर

**इचलकरंजी, ता. २० :** डीकेएएससी महाविद्यालयात रक्तदान शिबिर पार पडले. स्वामी विवेकानंद जयंती सप्ताह व विवेकानंद संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून एनसीसी व एनएसएस विभागाने रक्तदान शिबिराचे आयोजन केले होते.

शिबिराचे उद्घाटन प्राचार्य डॉ. व्ही. एस. ढेकळे यांनी केले. महाविद्यालयातील शिक्षकांसह विद्यार्थ्यांचा रक्तदान शिबिरास उत्तम प्रतिसाद लाभला. यावेळी मेजर मोहन वीरकर, प्रा. अरुण कटकोळे, अभय यळरूटे, डॉ. डी. सी. कांबळे, प्रा. टी. ए. हराळे, प्रा. वैशाली ढोबळे आदी उपस्थित होते.

CS Scanned with CamScanner

सकाळ

सोमवार,
२५ जानेवारी २०२१

# डीकेएएससी महाविद्यालयात व्याख्यान

इचलकरंजी : डीकेएएससी महाविद्यालयात शिवाजी विद्यापीठ मराठी शिक्षक संघ सामंजस्य करारांतर्गत एएससी कॉलेज आणि देवचंद कॉलेज यांच्यातर्फे 'मराठी भाषा पंधरवडा' निमित्त दृकश्राव्य माध्यमातून व्याख्यान पार पडले. 'मराठी वसा आणि वारसा' या विषयावर डॉ. रमेश साळुंखे यांनी विचार मांडले. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. व्ही .एस. ढेकळे होते. डॉ. एकनाथ आळवेकर यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. शिवाजी विद्यापीठ मराठी शिक्षक संघाचे सचिव डॉ. प्रकाश दुकळे यांची प्रमुख उपस्थिती होती. प्रा. प्रवीणसिंह शिलेदार यांनी सूत्रसंचालन केले. देवचंद कॉलेजच्या प्रा. आशालता खोत यांनी आभार मानले.

Scanned with CamScanner

सकाळ

सोमवार,
२५ जानेवारी २०२१

# इंधनाशिवाय हायड्रोजनवर चालणार गाड्या

## डॉ. महेश सूर्यवंशी यांचे संशोधन; इंधनातून होणाऱ्या प्रदूषणाला दिला पर्याय

नंदिनी नरेवाडी - पाटोळे :
सकाळ वृत्तसेवा

**आम्ही कोल्हापुरी**

कोल्हापूर, ता. २४ : रस्त्यावरून धावणाऱ्या वाहनांसह स्पेस रॅकिटला ऊर्जा पुरवण्यासाठी पेट्रोल किंवा डिझेलची गरज भासते, मात्र या इंधनाच्या वापरामुळे पर्यावरणात अनेक विषारी वायूचे प्रदूषण होते. त्यात नायट्रिक ऑक्साईड, कार्बन मोनॉक्साईड, कार्बन व सल्फर डायऑक्साईड आणि शिसे यांचा समावेश आहे. भविष्यात हे इंधन उपलब्ध होण्यात मर्यादाही आहेत. यासारख्या अडचणी लक्षात घेऊन नवीन स्वच्छ इंधनांचा शोध घेण्याचे प्रयत्न जगभर सुरू आहेत. या संशोधनात कोल्हापूरचा एक युवक अग्रभागी आहे. या युवकाचे नाव आहे, डॉ. महेश सूर्यवंशी.



डॉ. महेश सूर्यवंशी

ऑस्ट्रेलियातील युनिव्हर्सिटी ऑफ न्यू साऊथ वेल या संस्थेत ते सौरऊर्जेतून हायड्रोजनच्या निर्मितीबाबत संशोधन करतात. हे विद्यापीठ सोलर ऊर्जेबाबतच्या संशोधन करणाऱ्या जगभरातील नामांकित संस्थांमधील एक आहेत. सोलर ऊर्जेपासून तयार होणाऱ्या हायड्रोजनच्या वापरातून वाहनांसह स्पेस रॅकिट चालू शकणार आहेत. सोलर पॅनिलमधून ऊर्जानिर्मितीचा प्रयोग सर्वांना माहीत आहे, मात्र हे सोलर पॅनिल सिलिकॉनपासून तयार केले जाते. हे सोलर पॅनिल सर्वसामान्यांच्या आवाक्याबाहेरचे आहे. याला पर्याय म्हणून इतर धातू-अधांतुच्या वापरातून सर्वसामान्यांना परवडेल असे सोलर पॅनिलबाबतीतही ते संशोधन करत आहेत.

डॉ. सूर्यवंशी मूळचे इचलकरंजीचे. दत्ताजीराव कदम आर्टस, सायन्स ॲण्ड कॉमर्स कॉलेजमधून त्यांनी पदवीचे शिक्षण घेतले. शिवाजी विद्यापीठातून भौतिकशास्त्र विषयातून एमएस्सी पूर्ण केली. तेथेच पी.एच.डीचे शिक्षण घेताना साऊथ कोरियाकडून त्यांना स्कॉलरशिप मिळाली. २०१२ पासून पुढे तीन वर्षे त्यांनी येथे सोलर सेलमध्ये संशोधन केले. याबद्दल त्यांना २०१५ मध्ये पीएच. डी. प्रदान केली. त्यांना शिवाजी विद्यापीठाचे प्र- कुलगुरू प्रा. डॉ. पी. एस. पाटील व प्रा. डॉ. ए. व्ही. मोहोळकर यांचे मार्गदर्शन लाभले.

### ऑस्ट्रेलियात २.४ कोटींची फेलोशिप

त्यांना ऑस्ट्रेलियन शासनाच्या रिसर्च कौन्सिलने डिस्कव्हरी अर्ली करिअर रिसर्चर ॲवॉर्डने गौरविले आहे. यात त्यांना स्वत:चा रिसर्च ग्रुप तयार करण्यासाठी २.४ कोटींची फेलोशिप मिळाली. या ग्रुपद्वारे सौरऊर्जेचा वापर करून कमी खर्चात वीज आणि हायड्रोजननिर्मितीबाबत संशोधन केले जाणार आहे. यासाठी त्यांना ऑस्ट्रेलियात 'फादर ऑफ फोटोव्होल्टेइक्स' अशी ओळख असणाऱ्या प्रा. मार्टिन ग्रीन व प्रा. शॉवजिंग हाऊ यांचे मार्गदर्शन मिळते.

Scanned with CamScanner

दै. सकाळ . दि 27-1-2021

# इचलकरंजीत डीकेएससी महाविद्यालयात चर्चासत्र

**इचलकरंजी :** डीकेएससी महाविद्यालयात चर्चासत्र झाले. डॉ. आर. आर. मुधोळकर यांनी मार्गदर्शन केले. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. व्ही. एस. ढेकळे होते. डॉ. सी. बी. पाटील यांनी स्वागत केले. बी. ए. यादव यांनी आभार मानले. ए. एन. पाटील यांनी सुत्रसंचालन केले. नियोजन व्ही. व्ही. गणबावले, प्रा. अक्षय स्वामी यांनी केले.

Scanned with CamScanner

सकाळ

कोल्हापूर, गुरुवार, २८ जानेवारी २०२१

## 'डीकेएएससी'त मतदार जागृतीदिन

इचलकरंजी : डीकेएएससी महाविद्यालयात राष्ट्रीय मतदार जनजागृती दिन झाला. राष्ट्रीय सेवा योजना प्रमुख प्रा. अरुण कटकोळे यांनी प्रतिज्ञेचे वाचन केले. या वेळी प्राचार्य डॉ. व्ही. एस. ढेकळे, डॉ. डी. सी. कांबळे, मेजर मोहन विरकर, प्रा. डॉ. पी. पी. पुजारी, प्रा. ए. एस. तपासे, विद्यार्थी उपस्थित होते.

Scanned with CamScanner

सकाळ

शुक्रवार,
२९ जानेवारी २०२१

# प्रजासत्ताक दिन उत्साहात

**डीकेएएसी महाविद्यालय**

प्राचार्य डॉ. विठ्ठलराव ढेकळे यांच्या हस्ते ध्वजवंदन झाले. डॉ. डी. सी. कांबळे, प्रा. आकाश बनसोडे, मेजर मोहन वीरकर, अरुण कटकोळे उपस्थित होते.

Scanned with CamScanner

सकाळ
बुधवार,
३ फेब्रुवारी २०२१



इचलकरंजी : डीकेएएसी महाविद्यालयाच्या राष्ट्रीय बास्केटबॉल स्पर्धेसाठी निवड झालेल्या खेळाडूंसमवेत प्राचार्य डॉ. व्ही. एस. ढेकळे, प्रा. मेजर मोहन वीरकर आदी.

# 'डीकेएएसी'च्या खेळाडूंची निवड

**इचलकरंजी :** डीकेएएसी महाविद्यालयाच्या पाच खेळाडूंची राष्ट्रीय बास्केटबॉल स्पर्धेसाठी निवड झाली आहे. समीर कंबोगी, अभिषेक शिंदे, गुरूराज शिंदे, केदार कोदले, रोहित साळवी यांची १९ वर्षाखालील बास्केटबॉल साठी महाराष्ट्र संघातून निवड झाली आहे. गोवा येथे झालेल्या राष्ट्रीय स्पर्धेतही त्यांनी सुवर्णपदक प्राप्त केले. त्यांची शिमला येथे होणाऱ्या राष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे. खेळाडूंना प्राचार्य डॉ. व्ही. एस. ढेकळे, प्रा. मोहन वीरकर, प्रा. आकाश बनसोडे, प्रा. वैशाली ढोबळे आदींचे मार्गदर्शन लाभले.

CS Scanned with CamScanner

सकाळ
शुक्रवार, ५ फेब्रुवारी २०२१

# 'डीकेएएसी'मध्ये बक्षिस वितरण

इचलकरंजी, ता. ४ : डीकेएएससी महाविद्यालयात शिक्षण महर्षी डॉ. बापूजी साळुंखे निबंध, वक्तृत्व, चित्रकला स्पर्धेचा बक्षीस वितरण समारंभ झाला. प्राचार्य डॉ. व्ही. एस. ढेकळे यांच्या हस्ते विजेत्या स्पर्धकांना पारितोषिके देण्यात आली. अध्यक्षस्थानी डॉ. डी. सी. कांबळे होते. प्रास्ताविक स्पर्धा समन्वयक प्रा. डॉ. सुनिता वेल्हाळ यांनी केले. आभार प्रा. विश्वंभर कुलकर्णी यांनी मानले. डॉ. डी. जी. घोडके, डॉ. शिंदे, डॉ.अर्जुन जाधव, डॉ. बेंद्रे, प्रा. विशाल कांबळे आदी उपस्थित होते.

CS Scanned with CamScanner

सकाळ
सोमवार,
८ फेब्रुवारी २०२१

# 'डीकेएएसी'ला सिंह यांची भेट

सकाळ वृत्तसेवा

इचलकरंजी, ता. ७ : डीकेएएससी महाविद्यालयास बुधवारी एनसीसी कोल्हापूर विभागाचे ग्रुप कमांडर ब्रिगेडीयर आर. के. सिंह यांनी भेट दिली. एनसीसी विभागाला भेट देऊन पाहणी केली. त्यांच्या समवेत ट्रेनिंग ऑफीसर, लेफ्टनंट कर्नल जी. आर. सुनिलकुमार, कमांडिग ऑफीसर कर्नल एम. के. तिवारी, सुभेदार मेजर पाटील होते. प्रा. मेजर मोहन वीरकर यांनी एनसीसी विभागातर्फे घेण्यात येणाऱ्या उपक्रमांची माहिती दिली. प्राचार्य डॉ. व्ही. एस. ढेकळे, प्राचार्य डॉ. अनिल पाटील उपस्थित होते.

CS Scanned with CamScanner

सकाळ

मंगळवार,
९ फेब्रुवारी २०२१

# शैलजा चनगुंडी यांना पीएच.डी.




शैलजा चनगुंडी

**कोल्हापूर :** इचलकरंजी येथील डीकेएएससी कॉलेजमधील निवृत्त सहयोगी प्राध्यापिका व माजी इंग्रजी विभाग प्रमुख शैलजा चनगुंडी यांना पीएच. डी. मिळाली. 'अ व्हिजन ऑफ द न्यू वर्ल्ड : स्टडी ऑफ इयान बँक्सस सायन्स फिक्शन' या विषयावर त्यांनी शोधनिंबध सादर केला. देवचंद कॉलेजचे निवृत्त प्राचार्य डॉ. ए. जी. जोशी, स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे, सचिव प्राचार्या शुभांगी गावडे, प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार यांचे मार्गदर्शन मिळाले.

CS Scanned with CamScanner

सकाळ

बुधवार,
१७ फेब्रुवारी २०२१



इचलकरंजी : डीकेएएससी महाविद्यालयात सायन्स असोसिएशनच्या उद्घाटनप्रसंगी बोलताना आरोग्याधिकारी डॉ. सुनीलदत्त संगेवार आदी.

## ‘डीकेएएससी’मध्ये सायन्स असोसिएशन

**इचलकरंजी :** डीकेएएससी महाविद्यालयात सायन्स असोसिएशनचे उद्घाटन पालिकेचे आरोग्याधिकारी डॉ. सुनीलदत्त संगेवार यांच्या हस्ते झाले. प्राचार्य डॉ. व्ही. एस. ढेकळे अध्यक्षस्थानी होते. डॉ. संगेवार यांनी आरोग्य मंत्र देत कोविड आजार आणि लसीसंबंधी माहिती दिली. स्वागत व प्रास्ताविक डॉ. सौ. पी. पी. पुजारी यांनी केले. पाहुण्यांचा परिचय प्रा. डी. ए. यादव यांनी करून दिला. आभार प्रा. एस. पी. थोरात यांनी मानले. सूत्रसंचालन डॉ. एन. एच. शेख यांनी केले.

CS Scanned with CamScanner

सकाळ

कोल्हापूर, गुरुवार,
१८ फेब्रुवारी २०२१

# भौतिकशास्त्राची ऑनलाईन कार्यशाळा

इचलकरंजी, ता. १७ : डीकेएएससी महाविद्यालयात भौतिकशास्त्राची ऑनलाईन कार्यशाळा झाली. बीजभाषक डॉ. के. वाय. राजापूरे यांच्याहस्ते कार्यशाळेचे उद्घाटन झाले. प्रथम सत्रात ए. आर. चव्हाण, एच. आर. इंगवले यांनी न्यूक्लिअर ॲण्ड पार्टीकल फिजिक्स या विषयावर मार्गदर्शन केले. द्वितीय सत्रात एल. डी. जाधव व ए. ए. जत्राटकर यांनी मार्गदर्शन केले. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. व्ही. एस. ढेकळे होते. डॉ. व्ही. व्ही. गणबावले, सौ. व्ही. एस. ढोबळे, प्रा. पूजा यादव, प्रा. दिपाली सावंत आदी उपस्थित होते.

CS Scanned with CamScanner

सकाळ
शनिवार,
६ मार्च २०२१

# डीकेएएससी महाविद्यालयात कार्यशाळा

**इचलकरंजी :** डीकेएएससी महाविद्यालयात शिवाजी विद्यापीठ अंतर्गत इलेक्ट्रॉनिक्स विषयाच्या बदललेल्या अभ्यासक्रमावर ऑनलाईन कार्यशाळा झाली. बीजभाषण विद्यापीठाचे सायन्स अँड टेक्नॉलॉजी विभागाचे डॉ. आर. के. कामत यांनी केले. इलेक्ट्रॉनिक्स अभ्यास मंडळाचे प्रमुख डॉ. एस. एम. शेख यांनी मार्गदर्शन केले. प्रा. डी. ए. यादव यांनी प्रास्ताविक केले. प्रथम सत्रात प्रा. डी.आर. दिक्षित यांनी 'इलेक्ट्रॉनिक्स इन्स्टूमेंटेशन अॅन्ड रोबोटिक्स' या विषयावर मार्गदर्शन केले. दुसऱ्या सत्रात डॉ. एस. आर. कुंभार यांनी 'ऑप्टो इलेक्ट्रॉनिक्स अँड आयवोटी ' या विषयावर व्याख्यान दिले. तिसऱ्या सत्रात डॉ. पी. पी. शहा यांनी ' अॅडव्हान्स्ड मायक्रो कंट्रोलर पिक ' या विषयावर संवाद साधला. अंतिम सत्रात डॉ. पी. यु. लांडे यांनी 'इंडस्ट्रीयल ॲटोमेशन अॅन्ड पीएलसी प्रोग्रामिंग' या विषयावर व्याख्यान दिले. बदललेल्या अभ्यासक्रमाच्या विद्यार्थीभिमुख पद्धतीने संकल्पना मांडण्याच्या दृष्टीने सोप्या पद्धतीने मार्गदर्शन केले.

CS Scanned with CamScanner

सकाळ /8/3/2021

» दृष्टिक्षेपात




इचलकरंजी : डीकेएएसी महाविद्यालयात विवेक वाहिनीचे उद्घाटनप्रसंगी बोलताना हर्षल जाधव.

## 'डीकेएएसी'मध्ये विवेक वाहिनी

**इचलकरंजी :** डीकेएएसी महाविद्यालयात विवेक वाहिनीचे उद्घाटन झाले. चांगला माणूस घडवण्यासाठी विवेक वाहिनीची गरज आहे. यामध्ये स्वयंस्फूर्तीने विद्यार्थ्यांनी सहभाग घेऊन स्वत:ला पडलेल्या प्रश्नांची उत्तरे मिळवली पाहिजेत, असे मत प्रमुख पाहुणे हर्षल जाधव यांनी व्यक्त केले. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. व्ही. एस. ढेकळे होते. डॉ. एस. बी. बेंद्रे यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. ऋचिता पाटीलने परिचय करून दिला. किरण यादव आभार, तर सूत्रसंचालन वैभवी आढाव व सौरभ पवार यांनी केले. डॉ. अर्जुन जाधव, सुनील स्वामी, डॉ. डी. जी. घोडके आदी उपस्थित होते.

CS Scanned with CamScanner

सकाळ

बुधवार,
१० मार्च २०२१



इचलकरंजी : डीकेएएससी महाविद्यालयात आयोजित कार्यक्रमाच्या दीपप्रज्वलनप्रसंगी ॲड. दिलशाद मुजावर, प्राचार्य डॉ. ढेकळे, डॉ. पी. पी. पुजारी आदी.

# महिलांचा मानसन्मान ठेवावा

## ॲड. मुजावर; डीकेएएससी महाविद्यालयात कार्यक्रम

इचलकरंजी, ता. ९ : महाविद्यालयीन विद्यार्थी-विद्यार्थिनींना कायद्याची प्राथमिक माहिती असायला हवी. महिलांचा मानसन्मान ठेवायला हवा, असे मत ॲड. दिलशाद मुजावर यांनी व्यक्त केले. डीकेएएससी महाविद्यालय अंतर्गत तक्रार निवारण आणि महिला सबलीकरण समितीच्या उद्घाटनप्रसंगी त्या बोलत होत्या.

नो मिन्स नो अवेरनेस टू गर्ल्स प्रोटेक्शन या विषयावर दिलशाद मुजावर यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधला. अध्यक्षस्थानी प्रभारी प्राचार्य डॉ. व्ही. एस. ढेकळे होते. मुजावर म्हणाल्या, 'प्रत्येक क्षेत्रात मुली अग्रेसर आहेत. पालकांनी मुला-मुलींशी संवाद वाढवायला हवा. सर्वांनी महिला सबलीकरणाला प्रोत्साहन दिले पाहिजे.' प्राचार्य डॉ. ढेकळे यांनी मनोगत व्यक्त केले. प्रास्ताविक प्राणिशास्त्र विभागाच्या प्रमुख समन्वयक डॉ. पी. पी. पुजारी यांनी केले. डॉ. ए. ए. घारे यांनी आभार मानले. डॉ. एस. जे. वेल्हाळ यांनी सूत्रसंचालन केले.

KADAM A.S.C.COLLEGE ICHAL
LIBRARY

Scanned with CamScanner

सकाळ

कोल्हापूर, गुरुवार, ११ मार्च २०२१

# 'डीकेएएससी'मध्ये स्त्री सबलीकरणावर पथनाट्य

इचलकरंजी, ता.१० : रोटरी व ॲन्स क्लबतर्फे महिला दिनानिमित्त डीकेएएससी कॉलेजमध्ये स्त्री सबलीकरण या विषयावरील पथनाट्याचे उद्‍घाटन केले. अपर पोलिस अधीक्षक सौ. जयश्री गायकवाड, रोटरी डिस्ट्रिक्टच्या सौ. उत्कर्षा पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती. 'ती आणि बरंच काही' हे पथनाटय प्रकाश कोळी, महेश गवंडी, ऋतुजा शिरोटे, संध्या पाटील, निकिता कवडे यांनी सादर केले. पथनाट्याचे शहरात गांधी पुतळा, जनता चौक, शिवाजी पुतळा, हत्ती चौक येथे विविध ठिकाणी सादरीकरण झाले.

यशस्वी महिला उद्योजक सौ. उत्कर्षा पाटील व कर्तबगार महिला पोलिस अधीकारी जयश्री गायकवाड यांचा सत्कार केला. रोटरी क्लबचे अध्यक्ष अभय यळरूटे, दीपक निगुडगेकर, सौ. मेघा यळरुटे, सौ. वैभवी निंगुडगेकर, नेमिनाथ कोथळे, प्रकाश गौड उपस्थित होते. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. व्ही. एस. ढेकळे होते. अपर पोलिस अधीक्षक सौ. गायकवाड यांनी संघर्ष करीत स्त्रियांनी यश मिळवायला हवे आहे, असे सांगितले.

पथनाट्य सादरीकरणास सहायक पोलिस निरीक्षक गजेंद्र लोहार, पोलिस उपअधीक्षक बी. बी. महामुनी, जवाहर छाबडा यांनी भेट दिली. पथनाट्याचा समारोप हत्ती चौक येथे नगराध्यक्षा सौ. अलका स्वामी यांच्या उपस्थितीत झाला.



इचलकरंजी : डिकेएएससी कॉलेजमध्ये स्त्री सबलीकरण विषयावरील पथनाटयाच्या उद्‍घाटनप्रसंगी बोलताना अपर पोलिस अधीक्षक सौ. जयश्री गायकवाड.

CS Scanned with CamScanner

तरुण भारत शुक्रवार १२ मार्च २०२१

# विद्यार्थ्यांनी कायद्याची माहिती घेतलीच पाहिजे

## ॲड. दिलशाद मुजावर यांचे प्रतिपादन

प्रतिनिधी
इचलकरंजी

महाविद्यालयीन विद्यार्थी -विद्यार्थ्यांनींनी एक जाणकार नागरिक होण्यासाठी कायद्याची प्राथमिक माहिती करुन घेणे अत्यावश्यक आहे, असे प्रतिपादन ॲड. दिलशाद मुजावर यांनी डीकेएएससी महाविद्यालयाच्या तक्रार निवारण समिती आणि महिला सबलीकरण समितीच्या उद्घाटन प्रसंगी केले. अध्यक्षस्थानी प्रभारी प्राचार्य डॉ. व्ही. एस. ढेकळे होते.

नुकत्याच झालेल्या महिलादिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात दिलशाद मुजावर यांनी 'नो मिन्स नो, अवेरनेस टू गर्ल्स प्रोटेक्शन' या विषयावर विचार व्यक्त केले. त्या म्हणाल्या, प्रत्येक क्षेत्रात मुली अग्रेसर आहेत. तो आणखी वाढवण्यासाठी पालकांनी मुलींशी संवाद वाढवायला हवा. महिला सबलीकरणाला प्रोत्साहन देत महिलांचा मानसन्मान ठेवायला हवा, असे सांगून मुजावर यांनी तक्रार निवारण समितीच्या कार्याचा परिचय करून दिला. प्राचार्य ढेकळे यांनी स्त्री-पुरुषातील समानता सर्वच क्षेत्रात दिसायला हवी असे सांगत स्त्री व पुरुष हीच खरी जीवनाची दोन चाके असून ती एकत्रित चालली तरच जीवन सफल होईल असे हे पटवून दिले.

प्राणीशास्त्र विभागाच्या प्रमुख आणि अंतर्गत तक्रार निवारण समितीच्या समन्वयक डॉ. पी. पी.पुजारी यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. यावेळी डॉ. तपासे, डॉ. शेख, डॉ. वाघमारे, प्रा. ढोबळे, प्रा. माने ,प्रा. पाटील, महाविद्यालयातील प्राध्यापक, विद्यार्थी उपस्थित होते. महिला सबलीकरण समितीच्या समन्वयक डॉ. ए. ए. घारे यांनी आभार मानले. डॉ.एस. जे.वेल्हाळ यांनी सूत्रसंचालन केले



इचलकरंजी : येथील डी. के. ए. एस. सी. महाविद्यालयाच्या अंतर्गत तक्रार निवारण समिती आणि महिला सबलीकरण समितीच्या उद्घाटन प्रसंगी ॲड. दिलशाद मुजावर व मान्यवर.

CS Scanned with CamScanner

तरुण भारत
शुक्रवार, १२ मार्च २०२१

# डिकेएएंससी कॉलेजमध्ये भित्तीपत्रकाचे उद्घाटन

**इचलकरंजी** : येथील डिकेएएससी महाविद्यालयातील गणित विभागात उभारलेल्या भित्तीपत्रिकेचे प्रभारी प्राचार्य डॉ. व्हि. एस. ढेकळे यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले. यावेळी गणित विषयाची उपयोगिता या विषयाला अनुसरुन विद्यार्थ्यांनी विविध भित्तीपत्रिका (पोस्टर्स) तयार केल्या होत्या. डॉ. ढेकळे यांनी यावेळी सर्व भित्तिपत्रिकांची पाहणी करुन विद्यार्थ्यांची प्रशंसा केली. विद्यार्थ्यांशी मनमोकळेपणाने संवाद साधून त्यांना प्रोत्साहित केले. दुपार सत्रात इन्चार्ज डॉ. पी. पी. पुजारी, डॉ. व्ही. ए. पाटील, डॉ. सी .बी .पाटील, प्रा. यादव, ग्रंथपाल यादव प्रा. अक्षय स्वामी, प्रा.चेतन पाटील व गणित विभाग प्रमुख प्रा. एस .पी. थोरात, प्रा.डी.जे.मुंगारे यांच्या उपस्थितीत विद्यार्थ्यासाठी मार्गदर्शन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. पार पडला. याप्रसंगी विद्यार्थ्यांनी सर्वांचे गुलाब पुष्प देऊन स्वागत केले. यावेळी गणित विभागाचे प्रमुख प्रा. एस. पी. थोरात आणि प्रा. डी. जे. मुंगारे उपस्थित होते.

CS Scanned with CamScanner

तरुण भारत शुक्रवार, १२ मार्च २०२१




इचलकरंजी : येथील डी. के. ए. एस. सी. कॉलेजमध्ये महिला दिनाच्या निमित्त आयोजित केलेल्या कार्यक्रमात बोलताना अप्पर पोलीस अधीक्षक जयश्री गायकवाड व उपस्थित मान्यवर.

# विद्यार्थीनींनो... यशासाठी संघर्ष करा

## अप्पर पोलीस अधिक्षक जयश्री गायकवाड यांचे प्रतिपादन

प्रतिनिधी
इचलकरंजी

जुन्या काळातील अनेक महिलांनी संघर्ष करीत यश मिळवले आहे. संकटे कितीही आली तरी न घाबरता त्याचा सामना करत ध्येय देखील प्राप्त केले आहे. हा आदर्श डोळ्यासमोर ठेवून महाविद्यालयीन विद्यार्थींनीनी ही आपल्या क्षेत्रात यश मिळविण्यासाठी संघर्ष करण्याची तयारी ठेवावी, असे आवाहन अप्पर पोलीस अधिक्षक जयश्री गायकवाड यांनी केले. येथील डीकेएएससी कॉलेजच्या राष्ट्रीय सेवा योजना व रोटरी क्लब यांच्यावतीने जागककि महिला दिनानिमित्त आयोजित केलोल्य कार्यक्रमात त्या बोलत होत्या. अध्यक्ष प्रभारी प्राचार्य डॉ. व्ही. एस. ढेकळे होते.

कार्यक्रमाच्या प्रारंभी स्त्री सबलीकरण या विषयावर पथनाट्य सादर केले. यानंतर रोटरी फर्स्ट लेडी उत्कर्षा पाटील यांनी महिला सबलीकरणासाठी सर्वांनी प्रयत्न करायला हवेत असे सांगितले. प्राचार्य ढेकळे यांनी नारीशक्तीचा सन्मान प्रत्येकाने करायला हवा असे सांगितले. यावेळी रोटरी वेल्फेअरचे अध्यक्ष नेमीनाथ कोथळे, प्रकाश गौड, पंकज कोठारी, सुरेखा कोथळे, राष्ट्रीय सेवा योजना प्रमुख प्रा. अरुण कटकोळे, मेजर विरकर, जिमखाना प्रमुख प्रा. बनसोडे व डॉ डी. सी. कांबळे उपस्थित होते. प्रा. अरुण कटकोळे यांनी आभार



Scanned with CamScanner

सकाळ

सोमवार,
१५ मार्च २०२१

# 'एएससी'त भित्तीपत्रिकेचे अनावरण

इचलकरंजी : एएससी महाविद्यालयात गणित विभागाच्या भित्तीपत्रिकेचे अनावरण प्राचार्य डॉ. व्ही. एस. ढेकळे यांच्या हस्ते झाले. गणित विषयाची उपयोगिता या विषयावर विद्यार्थ्यांनी सुमारे १६ संशोधनात्मक पोस्टर तयार केले. यावेळी प्रा. एस. पी. थोरात, प्रा. डी. जे. मुंगारे, डॉ. पी. पी. पुजारी, डॉ. व्ही. ए.पाटील, डॉ. सी. बी. पाटील, प्रा. डी. ए. यादव, प्रा. आतीष पाटील, प्रा. अक्षय स्वामी यांसह विद्यार्थी, प्राध्यापक उपस्थित होते.

CS Scanned with CamScanner

सकाळ

मंगळवार,
२३ मार्च २०२१ ३

# 'डीकेएएससी'मध्ये कार्यशाळा

इचलकरंजी : डीकेएएससी महाविद्यालयात अग्रणी महाविद्यालयअंतर्गत मराठी व हिंदी विभागाच्या वतीने एकदिवसीय कार्यशाळा झाली. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. व्ही. एस. ढेकळे होते. शिवाजी विद्यापीठ मराठी विभागातील प्रा. डॉ. नंदकुमार मोरे यांनी भाषा ही मानवी विकासाचे साधन असून प्रशासन, प्रकाशन, चित्रपट अशा अनेक क्षेत्रांतील रोजगाराच्या संधीसाठी भाषेवर प्रभुत्व असायला हवे, असे सांगितले. हिंदी विभागाचे प्रा. सुधाकर इंडी यांनी हिंदी भाषेत अनेक आव्हाने असल्याचे सांगत सरकारी, खासगी व शिक्षण क्षेत्रात नोकरीच्या संधी उपलब्ध असल्याचे सांगितले. समन्वयक डॉ. पी. के. वाघमारे यांनी अग्रणी महाविद्यालयाची भूमिका मांडली. प्रास्ताविक डॉ. एस. बी. बेंद्रे यांनी केले. पाहुण्यांचा परिचय प्रा. डॉ. एकनाथ आळवेकर यांनी करून दिला. प्रा. अंजली उबाळे यांनी आभार मानले. प्रा. अर्चना तराळ यांनी सूत्रसंचालन केले.

CS Scanned with CamScanner

सकाळ
बुधवार, २४ मार्च २०२१



इचलकरंजी : डीकेएएसी महाविद्यालयात भारतीय स्वातंत्र्याचा आजादी अमृतमहोत्सव कार्यक्रमप्रसंगी मान्यवर.

## 'डीकेएएसी'मध्ये आजादी अमृतमहोत्सव

**इचलकरंजी :** डीकेएएसी महाविद्यालयात भारतीय स्वातंत्र्याची ७५ वर्ष आजादी या अमृतमहोत्सव कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. भारतीय स्वातंत्र्यासाठी ज्या स्वातंत्र्य सैनिक, क्रांतीकारकांनी प्राणाची आहुती व बलिदान दिले. तुरूंगवास भोगला अशा सर्वांच्या कार्याचे स्मरण ठेवले पाहिजे. आजच्या युगात नैतिकतेचे आचरण करून भ्रष्टाचाररूपी राक्षसास आपण गाडले पाहिजे, असे मत प्राचार्य डॉ. व्ही. एस. ढेकळे यांनी व्यक्त केले. स्वागत व प्रास्ताविक प्रा. ए. एस. कटकोळे यांनी केले. एनसीसी व एनएसएस विभागाच्यावतीने आयोजन केले. मेजर मोहन वीरकर, डॉ. डी. सी. कांबळे, प्रा. आकाश बनसोडे, प्रा. टी. एस. हराळे, प्रा. विशाल कांबळे आदी उपस्थित होते.

## 'डीकेएएससी'मध्ये जल दिन

**इचलकरंजी :** डीकेएएससी महाविद्यालयात भूगोल विभागाच्यावतीने जागतिक जल दिन साजरा करण्यात आला. पाण्याची गरज, महत्व, वापर, पाणी टंचाई व उपाययोजना यावर सध्या समाजात विचार करण्याची गरज आहे. पळणाऱ्याला चालवा, चालविणाऱ्याला थांबवा आणि थांबलेल्याला जिरवा अशा प्रकारे पाण्याचे योग्य नियोजन करणे गरजेचे असल्याचे प्रमुख पाहुणे डॉ. आप्पासाहेब सुतार यांनी सांगितले. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. व्ही. एस. ढेकळे होते. प्रास्ताविक भुगोल विभाग प्रमुख डॉ. डी. सी. कांबळे यांनी केले. प्रा. सुनिल भोसले, डॉ. आतीष पाटील, प्रा. सचिन जाधव, प्रा. डॉ. नवनाथ नाईकवाडे आदी उपस्थित होते.

Scanned with CamScanner

तरुण भारत बुधवार, २४ मार्च २०२१

## रोजगाराच्या संधीवरील कार्यशाळेला तरूणांचा प्रतिसाद

**इचलकरंजी :** येथील डीकेएएससी कॉलेजमध्ये अग्रणी महाविद्यालय योजनेअंतर्गत मराठी व हिंदी विभागाच्यावतीने दूरदृश्यमाध्यमातून कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. अध्यक्षस्थानी प्रभारी प्राचार्य डॉ. व्ही. एस. ढेकळे होते. कार्यशाळेत शिवाजी विद्यापीठ मराठी विभागातील प्रा. डॉ. नंदकुमार मोरे, ए. आर. पाटील कन्या महाविद्यालयातील हिंदी विभागातील प्रा. सुधाकर इंडी यांनी मार्गदर्शन केले. डॉ. नंदकुमार मोरे यांनी भाषा ही मानवी विकासाचे साधन आहे. मराठी भाषेत मोठ्या प्रमाणात वेबसाईट असून प्रशासन, प्रकाशन, चित्रपट अशा अनेक क्षेत्रातील रोजगाराच्या संधीसाठी भाषाप्रभुत्व असायला हवे, असे सांगितले. प्रा. सुधाकर इंडी यांनी हिंदी विषयासाठी सरकारी, खासगी, शिक्षणक्षेत्र अशा विविध क्षेत्रात नोकरीच्या संधी उपलब्ध असल्याचे सांगितले. प्राचार्य डॉ. ढेकळे यांनी अनुवादाच्या क्षेत्राकडे रोजगाराची संधी म्हणून पाहता येईल. मराठी व हिंदी भाषेतील आव्हाने समजून घेऊन संधी मिळवता आली पाहिजे, असे सांगितले. प्रास्ताविक डॉ. एस. बी. बेंद्रे यांनी केले. प्रास्ताविक डॉ. एकनाथ आळवेकर यांनी केले. आभार प्रा. अंजली उबाळे यांनी मानले. सुत्रसंचालन प्रा. अर्चना तराळ यांनी केले. संगणक विभागाचे प्रा. स्वामी, प्रा. पाटील, प्रा. उपाध्ये यांचे सहकार्य लाभले.

## डीकेएएससी महाविद्यालयात जागतिक जल दिन साजरा

**इचलकरंजी :** डीकेएएससी महाविद्यालयात भूगोल विभागाच्यावतीने जागतिक जल दिन साजरा करण्यात आला. यानिमित्त आयोजित ऑनलाईन व्याख्यानात पाण्याची गरज, महत्त्व, वापर, पाणीटंचाई व त्यावरील उपाययोजना याविषयी बोलताना 'पळणाऱ्याला चालवा, चालणाऱ्याला थांबवा आणि थांबलेल्या जिरवा" असे पाण्याच्या नियोजनासंबंधी सावळजच्या आर. आर. पाटील महाविद्यालयाचे डॉ. आप्पासाहेब सुतार यांनी मत व्यक्त केले. प्रभारी प्राचार्य डॉ. व्ही. एस. ढेकळे यांनी जलसंधारण, पाण्याचा काटकसरीने वापर याविषयी कृतियुक्त सहभाग नोंदवावा असे आवाहन केले. प्रास्ताविक भूगोल विभाग प्रमुख प्रा. डॉ. डी. सी. कांबळे यांनी केले. पाहुण्याची ओळख प्रा. सुनील भोसले यांनी केले. सूत्रसंचलन डॉ. अतिश पाटील यांनी केले. आभार प्रदर्शन प्रा. सचिन जाधव यांनी केले. यावेळी भूगोल विभागातील प्रा. डॉ. नवनाथ नाईकनवरे, प्राध्यापक व विद्यार्थी उपस्थित होते.

HVR

Scanned with CamScanner

साप्ताहिक इचलकरंजी समाचार • गुरूवार २५/३/२०२१ •

# डी.के. एसएससी महाविद्यालयामध्ये बौद्धिक संपत्ती हक्क आणि पर्यावरणीय कायदा या विषयावर कार्यशाळा संपन्न

इचलकरंजी– येथील डी.के. एसएससी महाविद्यालयामध्ये 'रिसर्च प्रमोशन अँड मॉनिटरिंग कमिटी तसेच आय.क्यु.ए.सी.कमिटी' यांच्या संयुक्त विद्यमाने' बौद्धिक संपत्ती हक्क आणि पर्यावरणीय कायदा' या विषयावर एक दिवसीय कार्यशाळा संपन्न झाली. या कार्यशाळेमध्ये शहाजी लॉ कॉलेज, कोल्हापूर येथील डॉ. सविता रासम आणि डॉ.एम.सी.शेख या साधन व्यक्तिंनी मार्गदर्शन केले. कार्यशाळेच्या अध्यक्षस्थानी प्रभारी प्राचार्यडॉ.व्ही.एस.ढेकळे होते.

बौद्धिक संपदा हक्क या विषयावर बोलताना डॉ. सविता रासम यांनी बौद्धिक संपदा व्याख्या, प्रकार याबद्दल सांगून कॉपीराइट ,पेटंट कायदे, उच्च शिक्षणातील स्वामित्व हक्क,वाङ्.मयचौर्य याविषयी विस्तृत मार्गदर्शन केले. 'पर्यावरणीय कायदा 'याविषयी मार्गदर्शन करताना डॉ.एम.सी.शेख यांनी पर्यावरण शास्त्र आणि पर्यावरण कायदा या संकल्पना समजावून सांगून पर्यावरण संरक्षण आणि संवर्धन कायद्याची त्यांनी सखोल माहिती दिली.अध्यक्षस्थानावरून बोलताना प्रभारी प्राचार्य डॉ. ढेकळे यांनी ही कार्यशाळा बौद्धिक क्षेत्रातील आणि संवेदनशील व्यक्तींसाठी उपयुक्त असल्याचे सांगितले .

कार्यक्रमाचे स्वागत व प्रास्ताविक समन्वयक डॉ.ए.एस. तपासे यांनी केले आभार डॉ. डी.सी. कांबळे यांनी मानले तर सूत्रसंचालन डॉ.एस.जे.वेल्हाळ यांनी केले यावेळी डॉ.सौ.पी.पी. पुजारी ,डॉ.घोडके,डॉ.गाणबावले, दोन्ही समितीतील सदस्य, इतर प्राध्यापक उपस्थित होते.

Scanned with CamScanner

साप्ताहिक इचलकरंजी समाचार ● गुरूवार २५/३/२०२१ ●

# आव्हाने समजून घेऊन संधी मिळवता आली पाहिजे - प्राचार्य ढेकळे

इचलकरंजी. दि.२३-अनुवादाच्या क्षेत्राकडे रोजगाराची संधी म्हणून पाहता येईल. मराठी व हिंदी भाषेतील आव्हाने समजून घेऊन संधी मिळवता आली पाहिजे, असे प्रतिपादन प्राचार्य डॉ. व्ही.एस. ढेकळे यांनी केले. येथील डी.के.ए.एस.सी. कॉलेजमध्ये अग्रणी महाविद्यालय योजनेअंतर्गत मराठी व हिंदी विभागाच्यावतीने दूरदृश्यमाध्यमातून आयोजित अध्यक्षस्थानावरून बोलत होते.

कार्यशाळेत शिवाजी विद्यापीठ मराठी विभागातील प्राध्यापक डॉ. नंदकुमार मोरे, ए. आर. पाटील कन्या महाविद्यालयाच्या हिंदी विभागातील प्रा. सुधाकर इंडी यांनी मार्गदर्शन केले. डॉ.नंदकुमार मोरे यांनी भाषा ही मानवी विकासाचे साधन आहे. मराठी भाषेत मोठ्या प्रमाणात वेबसाईट असून प्रशासन, प्रकाशन, चित्रपट अशा अनेक क्षेत्रातील रोजगाराच्या संधीसाठी भाषाप्रभुत्व असायला हवे, असे सांगितले. प्रा. सुधाकर इंडी यांनी हिंदी भाषेत अनेक आव्हाने असल्याचे सांगून हिंदी विषयासाठी सरकारी, खाजगी, शिक्षणक्षेत्र अशा विविध क्षेत्रात नोकरीच्या संधी उपलब्ध असल्याचे सांगितले. यावेळी डॉ.एस.बी. बेंद्रे , डॉ. एकनाथ आळवेकर, प्रा. अंजली उबाळे, प्रा. अर्चना तराळ यांच्यासह प्रा. स्वामी, प्रा. पाटील, उपस्थित होते.

CS Scanned with CamScanner

सकाळ

गुरुवार,
२५ मार्च २०२१

## भित्तीपत्रिकेचे 'डीकेएएससी'मध्ये अनावरण

इचलकरंजी, ता. २४ : डीकेएएससी महाविद्यालयात इलेक्ट्रॉनिक्स विभागाच्या भित्तीपत्रिकेचे अनावरण झाले. इलेक्ट्रॉनिक्स तंत्रज्ञानातील ट्रेंडस या विषयावर विद्यार्थ्यांनी विविध ११ पोस्टर्स तयार केले. प्राचार्य डॉ. व्ही. एस. ढेकळे यांच्याहस्ते भित्तीपत्रिकेचे उद्घाटन झाले. त्यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधला. विभागप्रमुख प्रा. डी. ए. यादव, डॉ. सी. बी. पाटील, प्रा. एस. पी. थोरात, प्रा. डी. जे. मुंगारे, डॉ. व्ही. बी. गणबावले, प्रा. व्ही. एस. ढोबळे आदी उपस्थित होते.

CS Scanned with CamScanner

तरुण भारत
शुक्रवार, २६ मार्च २०२१

# 'डीकेएएससी'मध्ये आजादी का अमृत महोत्सव साजरा

**इचलकरंजी :** येथील डीकेएएससी महाविद्यालय येथे भारतीय स्वातंत्र्याची ७५ वर्ष आजादी का अमृत महोत्सवाचे आयोजन एनएसएस, एनसीसी व इतिहास विभागातर्फे करण्यात आले होते. स्वागत प्रा. ए. एस. कटकोळे यांनी गुलाब पुष्प देऊन केले. प्रभारी प्राचार्य डॉ. व्ही. एस. ढेकळे यांची प्रमुख उपस्थिती होती.

भारतीय स्वातंत्र्याची ७५ वर्ष आपण साजरे करत आहोत. भारतीय स्वातंत्र्यासाठी ज्या-ज्या स्वातंत्र सैनिक, क्रांतिकारकांनी प्राणाची आहुती दिली, तुरुंगवास भोगला, अशा सर्वांच्या कार्याचे स्मरण आपणाला झाले पाहिजे. आजच्या युगात नैतिकतेचे आचरण करून भ्रष्टाचाररूपी राक्षसास आपण गाडले पाहिजे, असे मत डॉ. ढेकळे यांनी व्यक्त केले.

आभार प्रा. विशाल गोडबोले यांनी मानले. यावेळी डॉ. डी. सी. कांबळे, प्रा. बनसोडे, प्रा. कांबळे, प्रा. हराळे, मेजर विरकर, एनएसएस, एनसीसीचे विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

CS Scanned with CamScanner

तरुण भारत

शनिवार २७ मार्च २०२१

# डीकेएएससीमध्ये 'बौद्धिक संपत्ती हक्क, पर्यावरणीय कायदा'वर कार्यशाळा

**इचलकरंजी :** येथील डीकेएएससी महाविद्यालयामध्ये 'रिसर्च प्रमोशन अँड मॉनिटरिंग कमिटी तसेच आयक्युएसी कमिटी' यांच्या विद्यमाने बौद्धिक संपत्ती हक्क आणि पर्यावरणीय कायदा' यावर कार्यशाळा झाली. कार्यशाळेमध्ये शहाजी लॉ कॉलेज, कोल्हापूर येथील डॉ. सविता रासम आणि डॉ. एम. सी. शेख या साधन व्यक्तींनी मार्गदर्शन केले. अध्यक्षस्थानी प्रभारी प्राचार्य डॉ. व्ही. एस. ढेकळे होते. बौद्धिक संपदा हक्क यावर बोलताना डॉ. सविता रासम यांनी बौद्धिक संपदा व्याख्या, प्रकार याबद्दल सांगून कॉपीराईट, पेटंट कायदे, उच्च शिक्षणातील स्वामित्व हक्क, वाङ्मय चौर्य याविषयी मार्गदर्शन केले. डॉ. एम. सी. शेख यांनी पर्यावरण शास्त्र आणि पर्यावरण कायदा या संकल्पना समजावून सांगून पर्यावरण संरक्षण आणि संवर्धन कायद्याची त्यांनी माहिती दिली. प्रभारी प्राचार्य डॉ. ढेकळे यांनी ही कार्यशाळा बौद्धिक क्षेत्रातील आणि संवेदनशील व्यक्तीसाठी उपयुक्त असल्याचे सांगितले. स्वागत समन्वयक डॉ. ए. एस. तपासे यांनी केले. आभार डॉ. डी. सी. कांबळे यांनी मानले. सूत्रसंचालन डॉ. एस. जे. वेल्हाळ यांनी केले. यावेळी डॉ. सौ. पी. पी. पुजारी, डॉ. घोडके, डॉ. गाणबावले, सदस्य, प्राध्यापक उपस्थित होते.

CS Scanned with CamScanner

सकाळ

बुधवार,
३१ मार्च २०२१

## 'डीकेएएससी'मध्ये कार्यशाळा

इचलकरंजी : डीकेएएससी महाविद्यालयात 'बौद्धिक संपत्ती हक्क आणि पर्यावरणीय कायदा' या विषयावर कार्यशाळा झाली. डॉ. सविता रासम यांनी बौद्धिक संपदा व्याख्या व प्रकार याबाबत माहिती सांगून कॉपीराईट, पेटंट कायदे, उच्चशिक्षणातील स्वामीत्व हक्क, वाङ्मय चौर्य याबाबत मार्गदर्शन केले. डॉ. एम. सी. शेख यांनी पर्यावरणशास्त्र आणि पर्यावरण कायदा याबाबत माहिती दिली. प्राचार्य डॉ. व्ही. एस. ढेकळे अध्यक्षस्थानी होते. समन्वयक डॉ. ए. ए. तपासे यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. डी. सी. कांबळे यांनी आभार मानले. डॉ. एस. जे. वेल्हाळ यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. सौ. पी. पी. पुजारी, डॉ. घोडके, डॉ. गणबावले आदी उपस्थित होते.

CS Scanned with CamScanner